तरुण भारत शनिवार, २० ऑगस्ट २०२२

# संघटित उठावामुळे देशाला स्वातंत्र्य

## प्राचार्या माधुरी शानभाग यांचे प्रतिपादन : रवळनाथ सोसायटीत व्याख्यान

**प्रतिनिधी**

गडहिंग्लज

लोकमान्य टिळक, लाला लजपत राय, बिपीनचंद्र पाल यांचे योगदान आणि महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली सर्वसमावेशक लढयामुळे स्वातंत्र्याची चळवळ तीव्र आणि गतिमान झाली. शेतकरी, शेतमजूर, कामगार, महिला आणि तरूण यांच्या संघटीत उठावामुळे देशाला स्वातंत्र्य मिळाले, असे मत प्राचार्या माधुरी शानभाग यांनी व्यक्त केले. रवळनाथ सोसायटीत ज्ञानदीप प्रबोधीनी, झेप ॲकडमी व इंटेट करिअर ॲकडमी यांच्या विद्यमाने 'स्वातंत्र्याचा लढा : भारत काल, आज व उद्या' या विषयावर प्राचार्या शानभाग बोलत होत्या. रवळनाथच्या संचालिका मिना रिंगणे अध्यक्षस्थानी होत्या.



**गडहिंग्लज : येथील व्याख्यानात बोलताना प्राचार्या माधुरी शानभाग. यावेळी उपस्थित मिना रिंगणे, एस. एन. देसाई, मनोहर गुरबे, डी. के. मायदेव आदी.**

प्राचार्या शानभाग म्हणाल्या, स्वातंत्र्यानंतर शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान व संशोधन या क्षेत्रात देशाने मोठी प्रगती केली आहे. परंतु स्वातंत्र्यासाठी झगडलेल्या घटकांना भावी पिढयांनी विसरू नये. आपल्या कामाशी प्रामाणिक राहून आपले कुटूंब सुखी व सुरक्षित करावे. पर्यायाने देशही सुखी व सुरक्षित राहिल असे मत त्यांनी व्यक्त केले. सानिका मुंगारे यांच्या देशभक्तीपर गीताने कार्यक्रमाची सुरूवात झाली. मनोहर गुरबे यांनी प्रास्ताविक केले. एस. एन. देसाई यांनी आभार मानले. रेखा पोतदार यांनी सूत्रसंचालन केले. बी. बी. आरबोळे, महेश मजती, उमा तोरगल्ली, डी. के. मायदेव, सागर माने, गौरी बेळगुद्री, निजगुणी स्वामी यांच्यासह अन्य मान्यवर विद्यार्थी, कर्मचारी उपस्थित होते.